# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि
# सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५. दूरध्वनी क्र :- ९८४९२९७५०४

## जाहीर सूचना

नोव्हेंबर २०२२ मध्ये पणजी येथे होणाऱ्या ५३ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये (IFFI) राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या **'फिल्मबाजार-२०२२'** या माध्यमातून Industrial Screening साठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत जास्तीत जास्त १० मराठी चित्रपटांची निवड करण्याकरीता दि.०१/०८/२०२१ ते ३१/७/२०२२ या कालावधीत सेन्सॉर प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या चित्रपटांच्या निर्मिती संस्थांकडून निवड प्रक्रियेसाठी विहित नमुन्यातील अर्जाद्वारे प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील अर्ज **www.filmcitymumbai.org** या संकेतस्थळावर उपलब्ध असून विहित नमुन्यातील अर्ज भरून ते प्रत्यक्षात अथवा **gfffm2022@gmail.com** ई-मेलद्वारे दि.०३/०९/२०२२ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

निवड झालेल्या १० चित्रपटांची यादी जाहीर झाल्यानंतर निर्मिती संस्थांना त्यांच्या चित्रपटाची DCP व KDM स्वखर्चाने महामंडळास उपलब्ध करून द्यावी लागेल. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. ०२२-२८४९७५०४ या क्रमांकावर संपर्क साधता येईल. कोणत्याही वेळी जाहिरात रद्द करण्याचे सर्वाधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

**स्वाक्षरी /-**

**व्यवस्थापकीय संचालक**

**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि**

**सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित,**

**दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५**